जावक क्रमांक/ खाप्राशा /आरटीई / ३०
प्राथमिक शिक्षण समिती, महानगरपालिका,
कोल्हापूर. दिनांक ०३/०१/२०२०

E-3 JAN 2020

प्रति,
प्रभारी मुख्याध्यापक,
कोल्हापूर पब्लिक स्कूल, राजेंद्र नगर, कोल्हापूर

**विषय:- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्राबाबत.**

आपल्या दिनांक ०५/१२/२०१९ च्या अर्जाचा संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणी या आधारे मी प्रशासनाधिकारी, प्राथमिक शिक्षण समिती, महानगरपालिका, कोल्हापूर सन २०१९-२० पासून सन २०२१-२२ पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता १ ली ते ८ वी करीता आर.एल.तावडे फौंडेशन, कोल्हापूर संचलित कोल्हापूर पब्लिक स्कूल, राजेंद्र नगर, कोल्हापूर या खाजगी कायम विना अनुदानित (स्वयंअर्थसहाय्यीत) इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वये तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ (जोडपत्र - १) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र - २) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ टक्के मर्यादेपर्यंत देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमांच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था/ शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या किंवा तिच्या माता पित्यास पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (अ) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
(ब) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षण किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(क) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(ड) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(इ) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतूदीनुसार समावेश करण्यात येईल.
(फ)अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान शैक्षणिक / व्यवसाईक अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतू आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.



Scanned with CamScanner

(ग) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची/ तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.

(ह) शिक्षकाने/ शिक्षिकेने खाजगी शिकवणी कामात स्वत: गुंतवून घेवू नये, यांची सूनिश्चिती शाळा करेल.

८. शाळा समूचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलने विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

(अ) शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- १८,२१० चौ.मी

(ब) एकूण बांधकाम क्षेत्रफळ :- १६२५ चौ. मी

(क) खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ :- १३,५०० चौ.मीटर

(ड) वर्गखोल्यांची संख्या :- १९

(इ) कार्यालय - नि - भांडार - नि - मुख्याध्यापकांची खोली :- आहे

(फ) मुलांसाठी व मुलींसासठी स्वतंत्र प्रसाधनगृह :- उपलब्ध आहेत.

(ग) पिण्याच्या पाण्याची सुविधा :- आहे

(ह) दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर :- लागू नाही

(च) अध्यापन/ अध्ययन साहित्य/ खेळ व क्रीडाविषयक सामग्री, ग्रंथालय याची उपलब्धता :- आहे

(छ) वाचन साहित्य विनासायास उपलब्ध :- आहे

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाही.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्यासाठी किंवा कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी प्रशासनाधिकारी / जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक २७३४१३०७७०३ कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी / प्रशासनाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर - पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल. अशा सूचनांचे पालन करावे.

१८. रजिस्ट्रेशन ऑफ सोसायटीचे नूतनीकरणाची खातरजमा करावी.

१९. शासन अथवा वरिष्ठ कार्यालयाकडून सदर मान्यतेबाबत काही नव्याने आदेश प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही ठेवण्यात येईल. तसेच इतर काही बाबतीत तफावत दिसून आल्यास कोल्हापूर पब्लिक स्कूल, कोल्हापूर या शाळेस देण्यात आलेल्या मान्यता प्रमाणपत्राबाबत फेर विचार करण्यात येईल.

प्रत माहितीसाठी सादर:-

मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

मा. शिक्षणाधिकारी (प्राथ),जिल्हा परिषद, कोल्हापूर.

Principal
Kolhapur Public School
Affiliation No. 1130076

Chairman
R. L. Tawde Foundation s
Kolhapur Public School

प्रशासनाधिकारी
प्राथमिक शिक्षण समिती, म.न.पा.,
कोल्हापूर.

Scanned with CamScanner